# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – ३५
## सभावृत्तांत

दिनांक – २०.९.२०१९ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर - २०१९ ची मासिक मा. महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०.९.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर

२) मा.कुंदन अंबादास गायकवाड

३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

४) मा.साधना अंकुश मळेकर

५) मा.दत्तात्रय बाबूराव साने

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

९) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१०) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

११) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१३) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.बारसे प्रियांका प्रविण

१७) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

,

१८) मा.लांडगे सारिका संतोष

१९) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२२) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२३) मा.फुगे भिमाबाई पोपट

२४) मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२५) मा.लोंढे नम्रता योगेश

२६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२७) मा.लांडे विक्रांत विलास

२८) मा.गीता सुशिल मंचरकर

२९) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३०) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३१) मा.मंगला अशोक कदम

३२) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३३) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३४) मा.संजय बबन नेवाळे

३५) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३६) मा.भालेकर प्रविण महादेव

३७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३८) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३९) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४०) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४१) मा.चिखले सचिन तुकाराम

४२) मा.जावेद रमजान शेख

४३) मा.यादव मीनल विशाल

,

४४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४५) मा.प्रमोद कुटे

४६) मा.राजू मिसाळ

४७) मा.बाबर शर्मिला राजू

४८) मा.अमित राजेंद्र गावडे

४९) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५२) मा.ढाके नामदेव जनार्दन

५३) मा.करुणा शेखर चिंचवडे

५४) मा.भोईर सुरेश शिवाजी

५५) मा.अपर्णा निलेश डोके

५६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५८) मा.जयश्री वसंत गावडे

५९) मा.कोमल दिपक मेवानी

६०) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६१) मा.सुलक्षणा राजू धर

६२) मा.शाम गणपतराव लांडे

६३) मा.सुजाता सुनिल पालांडे

६४) मा.कदम निकीता अर्जुन

६५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६६) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६७) मा.पाडाळे निता विलास

६८) मा.काळे उषा दिलीप

६९) मा.पवार मनिषा प्रमोद

,

७०) मा.बारणे अर्चना तानाजी

७१) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७२) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७३) मा.बारणे माया संतोष

७४) मा.निलेश हिरामण बारणे

७५) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७६) मा.दर्शले रेखा राजेश

७७) मा.कलाटे राहुल तानाजी

७८) मा.ममता विनायक गायकवाड

७९) मा.चोंधे आरती सुरेश

८०) मा.कस्पटे संदिप अरुण

८१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८३) मा.सुनिता हेमंत तापकीर

८४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८५) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८६) मा.कुटे निर्मला संजय

८७) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८८) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८९) मा.आंगोळकर सागर सुनिल

९०) मा.कदम शशिकांत गणपत

९१) मा.लोखंडे चंदा राजू

९२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

९५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

,

९६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९८) मा.नवनाथ दत्तू जगताप

९९) मा.संतोष बबन कांबळे

१००) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०३) मा. वाबळे संजय मल्हारराव

१०४) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१०५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

याशिवाय मा. श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.अजित पवार – अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.कुंभोजकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.सवणे- प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे,मा.वाघमारे, इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.तांबे, मा.लडकत, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.भोसले संजय, मा.पाटील,मा.घुबे, मा.सेठीया, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.पवार मा.वाघुंडे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मा.डॉ.गोफणे- आरोग्याधिकारी, मा.बहुरे- प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर –** मा.नगरसेवक, नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग पत्रकार सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह श्री.बी.जी.खताळ पाटील-काँग्रेसचे जेष्ठ नेते तथा सभागृहाचे माजी मंत्री, डॉ.केतन खुर्जेकर – संचेती हॉस्पिटल येथील प्रसिध्दत मणका विकार तज्ञ, राजेंद्र अशोक शिंदे, श्रीमती मुक्ताबाई नामदेव आगवणे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

,

**मा.सुरेश भोईर** – अनुमोदन देतो.
**मा.महापौर –** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक-१
दिनांक २०/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.पअक/५/कावि/१४८/२०१९ दि.२९/०५/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८५१
दि.१२/०६/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२९ दि.७/९/२०१९

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालय तर्फे "बांधकाम साहित्य व राडारोडा यांच्यातील टाकाऊ घटकाच्या विल्हेवाट लावणे" या नियम २०१६ नुसार [C & D Waste Management Rule 2016] महानगरपालिकेने व्यवस्थापकाची जबाबदारी पार पाडावयाची आहे. पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालयच्या नियमांनुसार महानगरपालिकेने सदर यंत्रणेसाठी उपविधी [By laws] मंजूर करून सदर व्यवस्थापन खर्च राडारोडा निर्माण कर्त्याकडून वसूल करणे प्रस्तावित आहे. तसेच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून बांधकाम राडारोडयाचा पुर्नवापर करण्याच्या व टाकाऊ वस्तूचे प्रमाण कमी करण्या-या बांधकाम व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सवलती व सूट देणे याकरिता महानगरपालिकेतर्फे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

पूर्वपिठीका: भारत देशातील बांधकाम व्यवसायाच्या वृद्धी दर वार्षिक ७-८ टक्के आहे. पुढील वर्षात नीती आयोगाच्या अनुमानानुसार सध्याच्या बांधकामाच्या तिप्पट गृहनिर्माण प्रकल्प, रस्ते, व्यावसायिक व संस्थात्मक आस्थापना व मुलभूत सुविधा प्रकल्प भारतात प्रस्तावित आहेत. या प्रकल्पातून वाळू, खडी, दगड, चुनखडी, माती यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या प्रकल्पाच्या बांधकाम साहित्यातून निर्माण होणा-या राडारोड्यातून अनेक संसाधानाचे वर्गीकरण करून पुर्नवापर केला जाऊ शकतो. यासाठी

,

दिल्ली व अहमदाबाद येथे पथदर्शी प्रकल्प गेली ५ ते ६ वर्षापासून कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील व आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकाम प्रकल्प कार्यरत आहेत. शहरांतर्गत अनेक विकास प्रकल्पाचे बांधकाम शासन व महानगरपालिकेतर्फे व खाजगी स्वरुपात केले जात आहेत. शहरातील मध्यम वर्गामध्ये सातत्याने गृह दुरुस्ती करिता व सुधारणा करिता घराअंतर्गत बांधकाम साहित्यांचा वापर होत आहे. सद्यस्थितीत शहरात सदर टाकाऊ बांधकाम साहित्य नदी, नाले, ओढे, तळे इत्यादींच्या काठावर व इतर ठिकाणी अयोग्य पद्धतीने टाकण्यात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक स्त्रोतांचे प्रदूषण होत आहे. तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास होऊन अनारोग्य परिस्थिती निर्माण होते.

उद्दिष्ट: Construction and Demolition Waste Management Rule 2016 नुसार शहरात निर्माण होणा-या बांधकामाचा राडारोडा सुयोग्य पद्धतीने गोळा करून त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे. शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रियेतून वेगळ्या झालेल्या बांधकाम संसाधानाचा पुर्नवापर महानगरपालिकेतर्फे केल्या जाणा-या बांधकाम प्रकल्पामध्ये करणे तसेच खाजगी प्रकल्पामध्ये सदर साहित्याचा पुर्नवापर करणेसाठी प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे.

कृती आराखडा: १. शहरातील बांधकाम साहित्य वापर करण्या-या सर्व व्यावसायिक कंत्राटदार व नागरिक यांना पर्यावरण मंत्रालयातर्फे बांधकाम व दुरूस्ती निष्कासनातून निर्माण होणा-या राडारोड्याच्या महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम अंतर्गत भाग १८ तील २९०,२९१,२९२,२९३ नियम बंधनकारक असतील. २. बांधकाम व दुरूस्ती मधून निर्माण होणा-या राडारोडा व्यवस्थापनासाठी राडारोडा निर्मितीदारचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

श्रेणी क्र.१ : i शासनाच्या व महानगरपालिकेतर्फे नेमणूक केलेले कंत्राटदारामार्फत विविध विकास कामातून निर्माण होणारा राडारोडा. : ii खाजगी बांधकाम व्यावसायिक, संस्था व नागरिकांकडून करणेत येणारी बांधकामे ज्यांना महानगरपालिकेतर्फे खाजगी बांधकामासाठी प्राधिकृत वा परवानगी वितरीत बांधकामातून निर्माण होणारा राडारोडा. श्रेणी क्र.२ : i शासनाची व महानगरपालिकेची परवानगी आवश्यक नसलेले कोणतीही घरगुती आस्थापना अंतर्गत, संस्था अंतर्गत बांधकाम व

,

दुरुस्ती श्रेणी १ मध्ये अंतर्गत समाविष्ट नसलेले सर्व घटक : ii मनपा किंवा कोणत्याही प्राधिका-याकडून परवानगी न घेता करणेत येणा-या बांधकामामधून निर्माण होणारा राडारोडा.

श्रेणी क्र.१ अंतर्गत येणा-या घटकांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित असेल.

१. शासकीय/ निमशासकीय विभागाच्या विविध विभागामार्फत किंवा महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून कार्यादेश वितरीत झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत अथवा आपत्कालीन परिस्थितीत काम सुरु केल्यानंतर तीन दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकडे कामाचे स्वरूपानुसार निर्माण होणारे राडारोडाच्या अंदाजित प्रमाण व प्रकार कामाचे ठिकाण विहित नमुन्यात शासकीय/ निमशासकीय किंवा मनपाच्या संबधीत विभागाच्या कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकां-यांकडून प्रमाणित करून सादर करावे. सदर राडारोडा ५०० किलोपेक्षा जास्त असल्यास आवश्यक कंटेनरची संख्या निश्चित करून अंदाजित प्रक्रिया व वाहतूक खर्च तसेच महानगरपालिकेतर्फे साठवणूक कंटेनरसाठी आवश्यक ठेव रक्कम निश्चित करण्यात येईल.

२. राडारोडाचे दैनिक प्रमाण जास्त नसल्यास निर्मितीदार स्वतःचे कंटेनर वापरू शकतात व महानगरपालिकेच्या कॉल सेंटर मधिल यंत्रणाना राडारोडा उचलण्यासाठी संपर्क करू शकतात. महानगरपालिकेच्या यंत्रणांना टोल फ्रि क्रमांकावर राडारोडा उचलण्यासाठी संपर्क केल्यानंतर त्वरीत राडारोडा उचलण्याची व्यवस्था मनपाने नेमलेल्या कंपनीतर्फे करेल परंतु कोणत्याही परिस्थितीत राडारोडा नैसर्गिक जमिनीवर किंवा रस्त्यावर व इतरत्र टाकता येणार नाही याची जबाबदारी सबंधित संस्थावर व नागरिकांवर राहील.

३. अंदाजित प्रक्रीया खर्चाच्या कमीत कमी २५ टक्के रक्कम व साठवणूक कंटेनरकरिता ठेव रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल. श्रेणी १ मध्ये येणा-या महानगरपालिकेच्या कंत्राटदाराच्यावतीने संबधित विभागाचे अधिकारी विभागाचा Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात.

४. सध्या अस्तिवात असलेल्या राडारोडाच्या व अनाधिकृत बांधकामाच्या राडारोड्याच्या वहनासाठी व प्रक्रिया करण्यासाठी प्रभाग प्रमुखांना Login व Password

,

वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात. या करिता छायाचित्र सहित केलेली कार्यवाही व राडारोडा अंदाजित प्रमाण यांची नोंद करणे आवश्यक असेल.

५. महानगरपालिकेतर्फे राडारोडा व्यवस्थापनासाठी निर्माण करण्यात येणा-या मोबाईल ॲप व संकेतस्थळामध्ये Login व Password संबधित संस्था यांना अग्रीम रक्कम जमा झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

६. सदर ॲप व संकेत स्थळावर अंदाजित राडारोडाचे प्रमाण व जमा अग्रिम रक्कम खात्यामध्ये दिसेल.

७. सदर संस्थाने कंटेनर भरल्यानंतर अथवा सदर संस्थेने संपर्क केल्यानंतर राडारोडा उचलण्यासाठी वाहन पाठविले जाईल. सदर वाहनातील संगणक यंत्रणेव्दारे उचलण्यात आलेला राडारोडा त्याचे छायाचित्र व त्यांचे वजन तसेच सदर साठी आकारण्यात येणारी रक्कम महानगरपालिकेच्या समन्वय कक्षाकडे व मोबाईल ॲप वर दोन्ही कडून नोंदवण्यात येईल व अग्रिम रक्कमेतून वजावट करण्यात येईल.

८. राडारोडा उचलण्यात येण्यासाठी मोबाईल ॲपमधील शिल्लक रक्कम हि अंदाजित प्रमाणाच्या ५% पेक्षा जास्त असणे आवश्यक राहील.

९. सदर रक्कम ५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेने तात्काळ पुढील २५% टक्के भरणा करणे आवश्यक राहील.

श्रेणी २ अंतर्गत येणा-या घटकांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. श्रेणी २ अंतर्गत घटकांनी जमा झालेला राडारोडा, गनी बॅगमध्ये भरणे आवश्यक राहील. श्रेणी २ अंतर्गत सदर राडारोडा महानगरपालिकेच्या मोशी येथील Construction & Demolition पर्यंत स्वखर्चाने नेऊन देऊ शकतात. अथवा महानगरपालिकेच्या राडारोडा व्यवस्थापन केंद्रास टोल फ्रि क्रमांकावर संपर्क करून राडारोड्यासाठी वाहन Pickup साठी बोलवू शकतात.

२. राडारोडा मनपाच्या नजीकच्या ट्रान्स्फर स्टेशन पर्यंत नेल्यास श्रेणी १ व २ मधील घटकांना ट्रान्स्फर स्टेशन येथे वजनाप्रमाणे शुल्क भरणा करावा लागेल. सर्व श्रेणीसाठी पुढीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन शुल्क आकारणे प्रस्तावित आहे. राडारोडा

,

गोळा करणे. श्रेणी १ व २ बांधकाम राडारोडा उचलणे व मोशी राडारोडा प्रक्रिया केंद्रापर्यंत वहन खर्च र.रु.१५/- प्रति किमी/प्रतिटन राडारोड्यावर प्रक्रिया करणे. श्रेणी १ व २ बांधकामराडारोडा प्रक्रिया शुल्क. रक्कम रुपये. २५०/- प्रति टन

नियम बाह्य राडारोडा व्यवस्थापनाकरिता दंड :-

१. वरीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन यंत्रणाशी संपर्क न करता अथवा अनधिकृत राडारोडा टाकणा-या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक, कंत्राटदार, नागरिक व इतर घटकावर टाकलेल्या राडारोडाच्या वाहनासाठी व प्रक्रियेसाठी येणा-या खर्चाच्या १० पट शुल्क अधिक वहन व प्रक्रिया खर्च वसूल करण्यात येईल. तसेच नागरी घनकचरा व्यवस्थापन २०१६ व C & D Waste Management Rule 2016 च्या अधिनियमनुसार कार्यवाहीस पात्र राहतील.

२. वरीलप्रमाणे कोणत्याही श्रेणीमधील घटकाने नैसर्गिक, नदी, नाले, ओढे, इत्यादी जलस्त्रोतांच्या बाजूने विनापरवाना राडारोडा टाकलेचे निदर्शनास आल्यास, तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून १० पट दंडाची रक्कम तसेच त्यांचेवर फौजदारी गुन्हा मनपाच्या वतीने दाखल करणेत येईल.

राडारोडा पासून पुनर्निर्मित घटकाच्या वापरास प्रोत्साहन :-

१. (i) प्रक्रियायुक्त राडारोडा वापरणा-या बांधकाम व्यवसायिकांना प्रोत्साहन देण्याकरिता बांधकाममध्ये ग्रीन बिल्डींग रेटींग अंतर्गत GRIHA किंवा LEED प्रमाणपत्र घेणा-या बांधकाम प्रकल्पांना मालमत्ता करामध्ये प्रचलित नियमानूसार जास्तीत जास्त ५% सूट तसेच मोठ्या प्रकल्पामध्ये (Large Development) अथवा परवडणा-या (Affordable Housing) (GRIHA) गृहा मानांकननुसार प्रकल्पामध्ये चार स्टार व पाच स्टार प्रकल्पामध्ये गृह प्रमाणपत्र अथवा (Leed) लीड प्रमाणपत्रामध्ये Platinum अथवा गोल्ड दर्जा प्रमाणपत्र मिळवलेल्या प्रकल्पांना मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाकडील ग्रीन बिल्डींग रेटींगच्या योजनेनूसार प्रचलित सुट देय राहील.

(ii) प्रक्रियायुक्त राडारोड्यापासून निर्माण झालेल्या बांधकाम साहित्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणा-या बांधकाम व्यवसायिक किंवा, खाजगी नागरिकांना तसेच शासकीय /निमशासकीय/मनपाच्या ठेकेदारांना सदरचे साहित्य त्या-त्या वर्षाच्या चालू

,

बाजारभावापेक्षा २०% कमी दराने उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सींवर बंधनकारक राहील.

२. महानगरपालिकेतर्फे करण्यात येणा-या सर्व स्थापत्य, कामामध्ये राडारोड्यावर प्रक्रिया करून बनविलेल्या बांधकाम साहित्याचा वापर M२० grade पर्यंत Non structural भागासाठी वापर करणे बंधनकारक राहील त्यासाठी मनपाच्या शहर अभियंता कार्यालयाने आवश्यक साहित्याची मागणी प्रक्रिया केंद्राला तीन महिने आगाऊ पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे माध्यमातून कळविणे आवश्यक आहे. सदर स्थापत्य विषयक बाबींचे प्रत्येक वर्षीचे दर, स्थापत्य विभागामार्फत शहर अभियंता कार्यालयाकडून दरपृथ्थकरणाव्दारे निश्चित करणेत येतील. तसेच बाजार भावातील अशाच बाबींच्या दरापेक्षा सुमारे २०% कमी दराने सदरचे साहित्य मनपाच्या विविध विकास कामासाठी उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सीवर बंधनकारक राहील. त्याचा वापर मनपाच्या विविध विकास कामामध्ये आवश्यकतेनूसार करणेची दक्षता स्थापत्य/उद्यान/ड्रेनेज/पाणीपुरवठा इत्यादी विभागांकडून घेणेसाठी अशा बाबींचा समावेश निविदेमध्ये स्वतंत्रपणे करणेत येईल.

३. यामध्ये प्रामुख्याने पेव्हर ब्लॉक, कर्ब स्टोन, चेंबर्स कव्हर, ट्रि गार्ड, युटीलीटी डक्ट व इतर आवश्यकते प्रमाणे निर्माण होऊ शकणारे नाविन्यपूर्ण प्रिकास्ट प्रॉडक्टसचा समावेश असेल. या व्यतिरिक्त विविध विकास कामांसाठी लागणारे कच्चे साहित्य उदा. दगड, खडी, विटा, वाळू, माती इत्यादी सह रस्त्यासाठी लागणारा भराव, GSB, Wet - Mix इत्यादी विविध बांधकाम साहीत्याचा वापर मनपाच्या विविध विभागाकडील ठेकेदारांमार्फत करणेसाठीची कार्यप्रणाली शहर अभियंता कार्यालयाकडून निश्चित करणेत येईल. त्यानुसार याचा वापर मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील निर्माण होणा-या बांधकामाच्या राडारोड्याचे Construction and Demolition Waste Management Rule 2016 चे नियमानूसार वहन करुन त्याचेवर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन त्यापासून निर्माण होणा-या विविध Precast Product बांधकाम साहित्याचा पूर्ण वापर मनपाच्या व इतर खाजगी बांधकामामध्ये करणेच्या धोरणास [C & D Waste Policy] मान्यता देणेत यावी.

**मा.संतोष (आण्णा) लोंढे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

,

**मा.विलास मडिगेरी** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा. नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू –** मा.महापौर साहेब, सदर सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक -४५६ विषय क्रमांक- १
दिनांक २०/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/५/कावि/१४८/२०१९ दि.२९/०५/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८५१ दि.१२/०६/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२९ दि.७/९/२०१९

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४५७ विषय क्रमांक- २
दिनांक २०/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०८/ २०१९ दि.२७/०५/२०१९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१० दि.१६/८/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'अस्थिरोग तज्ञ' अभिनामाची २ पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. 'अस्थिरोग तज्ञ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननी शिवाय केवळ उमेदवाराने

,

ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'अस्थिरोग तज्ञ' या पदाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात(Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिति आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून, संभाव्य निवड क्षेत्रात येणा-या उमेदवारांकडे M.B.B.S., D.N.B.(Ortho) याप्रमाणे अर्हता आढळून येत असल्याने भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय (आरोग्य विभाग), नवी दिल्ली यांच्याकडील दि.१९ सप्टेंबर १९८३ रोजीच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने National Board of Examinations New Delhi यांच्याकडे शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्रांची प्रथमत:पडताळणी करुन घेण्याबाबत आणि प्रकरणी निवडीबाबत मार्गदर्शन मागविण्याबाबत निर्णय घेतलेला होता. त्यानुसार इकडील पत्र क्र.ADM/1/WS/490/2018, Dated 11/05/2018 अन्वये दि.19 सप्टेंबर 1983 रोजीच्या अधिसूचनेनुसार National Board of Examination New Delhi यांच्याकडून संबंधित उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन, शैक्षणिक अर्हता समकक्ष आहे किंवा कसे, तसेच अर्हता धारण केल्याबाबत ग्राह्य धरावयाचा दिनांक कोणता याबाबत मार्गदर्शन मिळण्याकामी विनंती करण्यात आलेली होती. उपसंचालक, राष्ट्रीय परीक्षा बोर्ड, नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र.Regn/Verification/2018/NBE/1379, Dated 06/06/2018 अन्वये स्वयंस्पष्ट अभिप्राय प्राप्त झालेले आहेत. सदरच्या अभिप्रायानुसार 'अस्थिरोग तज्ञ' पदाकरीता उमेदवारांची निवड करणेकामी दि.०५/०३/२०१९ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे गुण, शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी इ. च्या अनुषंगाने प्राप्त कागदपत्र, भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय (आरोग्य विभाग), नवी दिल्ली यांच्याकडील दि.19 सप्टेंबर 1983 ची अधिसूचना आणि मा.उपसंचालक, राष्ट्रीय परीक्षा बोर्ड, नवी दिल्ली यांचेकडील दि.

,

06/06/2018 च्या पत्रान्वये प्राप्त अभिप्राय यावर सविस्तर चर्चा करुन, डॉ.गायकवाड सौरभ दत्तात्रय यांना खुला (वि.जा.अ.) प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये अस्थिरोग तज्ञ या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्याकामी शिफारस केलेली आहे. सबब, डॉ.गायकवाड सौरभ दत्तात्रय यांना खुला (वि.जा.अ.) प्रवर्गातून वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'अस्थिरोग तज्ञ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.संतोष( आण्णा) लोंढे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४५८ विषय क्रमांक- ३

दिनांक २०/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०९/ २०१९ दि.२७/०५/२०१९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.११ दि.१६/८/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी अभिनामाची १६ पदे पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता मा.महापालिका सभा ठराव क्र.२७३६, दि.१४/०६/१९९४ नुसार खालीलप्रमाणे अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. "पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी की ज्यांची महापालिका सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर वर्ग २ मध्ये १० वर्षे सेवा झालेली आहे" दि.२८/०७/२०१७ च्या कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीनुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/२३५/२०१८, दि.०७/०३/२०१८ अन्वये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी संवर्गात रिक्त राहणा-या पदांवर डॉ.फिरके राजेंद्र प्रल्हाद आणि डॉ.गोफणे लक्ष्मण पांडुरंग यांना तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरुपात ११ महिने कालावधीकरीता देण्यात आलेली पदोन्नती संपुष्टात आल्याने निर्णय घेण्याकामी दि.०५/०३/२०१९ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने, डॉ.फिरके राजेंद्र प्रल्हाद

,

आणि डॉ.गोफणे लक्ष्मण पांडुरंग यांना आदेश क्र.प्रशा/१/कावि/२३५/२०१८, दि.०७/०३/२०१८ अन्वये तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरुपात देण्यात आलेली पदोन्नती दि.०६/०२/२०१९ पासून संपुष्टात आलेली आहे. पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि.२९ डिसेंबर २०१७ आणि पत्र क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.४६७ A/१६-ब, दि.११ ऑक्टोंबर २०१८ अन्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत निर्देश आहेत. ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त असणा-या पदांमध्ये खुल्या प्रवर्गाकरीता असलेले आरक्षण विचारात घेता, डॉ.फिरके राजेंद्र प्रल्हाद यांना खुला(इ.मा.व) आणि डॉ.गोफणे लक्ष्मण पांडुरंग यांना खुला (भ.ज.क.) प्रवर्गामध्ये सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, डॉ.फिरके राजेंद्र प्रल्हाद यांना खुला (इ.मा.व) आणि डॉ.गोफणे लक्ष्मण पांडुरंग यांना खुला (भ.ज.क.) प्रवर्गातून 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.संतोष ( आण्णा) लोंढे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

,

विषय क्रमांक -४

दिनांक २०/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/१३२/२०१९ दि.२६/०७/२०१९

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१० दि.१४/८/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस- १८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०७/नवि-१३, दि.०९ जुलै २००८, शासन निर्णय क्र.टिपीएस- १८०९/१९ (५) सिआर-१८९३/०९/नवि-१३, दि.१८/०८/२००९, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, निर्णय क्र. टिपीएस- १८०८/८९४/सी.आर.-१७२७/०९/नवि-१३, दि. १८ ऑगस्ट २००९ व अधिसुचना क्र. टिपीएस १८१२/१६०/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२ ई.पी.मंजूरी/नवि-१३, दि.०२/०३/२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेमध्ये मौजे वाकड ता मुळशी येथील मुळा नदी ते ताथवडे हद्दीपर्यंत मुंबई-बेंगलोर महामार्गाच्या दोन्ही बाजूस १२.०० मी. सर्व्हीस रस्ते प्रस्तावित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे वाकड मधील स.नं. १२२ पै., १२३ पै., १२१ पै. १३० पै. १३७ पै. १३१ पै. १३६ पै. १३५ पै. ४ पै. ५ पै. ६ पै. ८ पै. ९ पै. २ पै. १४२ पै. १४३ पै. १४५ पै. १४६ पै. १५३ पै. १६७ पै. १५६ पै. १५७ पै. १५८ पै. १५९ पै. १६४ पै. १६० पै. १६१ पै. १६२ पै. १६३ पै. ५१ पै. १२ पै. ७ पै. १० पै. मधील मुंबई- बेंगलोर महामार्ग ६० मी. रुंदीच्या शेजारील दोन १२.०० मी. चे सर्व्हीस रस्ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेनुसार आहेत. मौजे वाकड हिंजवडी मधील सुरळीत दळणवळणाच्या दृष्टीने तसेच हिंजवडी- शिवाजीनगर या मेट्रोच्या मार्गाकरीता सदरच्या दोन्ही १२.०० मी. सर्व्हीस रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविण्याकरीता मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम- २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीचे संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

,

**मा.संतोष ( आण्णा) लोंढे** – मा.महापौर साहेब. ठरावास अनुमोदन देतो.

**मा.विकास डोळस** – मा.महापौर साहेब. विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - भोसरी ते दिघी रस्त्यावरील सीएमई भिंती लगत सर्वे नं.६९.७२ व ८४ येथील रस्त्याची जागा ताब्यात घेत असताना जे मिळकत धारक बाधित होणार आहेत त्या सर्व मिळकत धारकांना मनपा नियमानुसार घरकुल योजनेत प्राधान्याने घरकुल वाटप करण्यास मान्यता देणेत यावी तसेच सांगवी प्रभाग ३२ मधील रोडमधील बाधीत असलेल्या घरमालकांना पिं.चिं.म.न.पा. कडून घर अधिकृत मिळणेस मान्यता देणेत यावी तसेच पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील रोडमधील बाधीत असलेल्या सर्व मिळकतधारकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे मनपा नियमानुसार घरकुल योजनेत प्राधान्याने घरकुल वाटप करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.निर्मला गायकवाड** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक- ४५९ विषय क्रमांक - ४
दिनांक २०/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/१३२/२०१९ दि.२६/०७/२०१९
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१० दि.१४/८/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस- १८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०७/नवि-१३, दि.०९ जुलै २००८, शासन निर्णय क्र.टिपीएस- १८०९/१९ (५) सिआर-१८९३/०९/नवि-१३, दि.१८/०८/२००९, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, निर्णय क्र. टिपीएस- १८०८/८९४/सी.आर.-१७२७/०९/नवि-१३, दि. १८ ऑगस्ट २००९ व अधिसुचना क्र. टिपीएस १८१२/१६०/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२ ई.पी.मंजूरी/नवि-१३, दि.०२/०३/२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेमध्ये मौजे वाकड ता मुळशी येथील मुळा नदी ते ताथवडे हद्दीपर्यंत मुंबई-बेंगलोर महामार्गाच्या दोन्ही बाजूस १२.०० मी. सर्व्हीस रस्ते प्रस्तावित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे वाकड

,

मधील स.नं. १२२ पै., १२३ पै., १२१ पै. १३० पै. १३७ पै. १३१ पै. १३६ पै. १३५ पै. ४ पै. ५ पै. ६ पै. ८ पै. ९ पै. २ पै. १४२ पै. १४३ पै. १४५ पै. १४६ पै. १५३ पै. १६७ पै. १५६ पै. १५७ पै. १५८ पै. १५९ पै. १६४ पै. १६० पै. १६१ पै. १६२ पै. १६३ पै. ५१ पै. १२ पै. ७ पै. १० पै. मधील मुंबई- बेंगलोर महामार्ग ६० मी. रुंदीच्या शेजारील दोन १२.०० मी. चे सर्व्हीस रस्ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेनुसार आहेत. मौजे वाकड हिंजवडी मधील सुरळीत दळणवळणाच्या दृष्टीने तसेच हिंजवडी- शिवाजीनगर या मेट्रोच्या मार्गाकरीता सदरच्या दोन्ही १२.०० मी. सर्व्हीस रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविण्याकरीता मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम- २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीचे संपादन करणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच भोसरी ते दिघी रस्त्यावरील सीएमई भिंती लगत सर्वे नं.६९.७२ व ८४ येथील रस्त्याची जागा ताब्यात घेत असताना जे मिळकत धारक बाधित होणार आहेत त्या सर्व मिळकत धारकांना मनपा नियमानुसार घरकुल योजनेत प्राधान्याने घरकुल वाटप करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच सांगवी प्रभाग ३२ मधील रोडमधील बाधीत असलेल्या घरमालकांना पिं.चिं.म.न.पा. कडून घर अधिकृत मिळणेस मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील रोडमधील बाधीत असलेल्या सर्व मिळकतधारकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे मनपा नियमानुसार घरकुल योजनेत प्राधान्याने घरकुल वाटप करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

,

विषय क्रमांक- ५

दिनांक २०/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.११ दि.३१/८/२०१९

चंद्रभागा गोशाळा संवर्धन संस्था ट्रस्ट (Reg.no.MAH/473/2014/PUNE-F-44979) ही संस्था गेल्या १२ वर्षापासून गोपालन क्षेत्रात काम करीत आहे. देशी गायींचे संगोपन करणे हाच गोशाळेतील गोपालनाचा उद्येश आहे. संस्थेने मागील पाच वर्षापासून चंद्रभागा गोशाळेची स्थापना केली आहे. काळया रंगाच्या अत्यंत दुर्मिळ ३० देशी गायी संस्थेकडे आहेत. संस्थेच्या गोमाता संवर्धनासाठी विशेष योगदान देण्याचा मानस आहे. तसेच त्या अनुषंगाने दुध न देणा-या गायी, आजारी किंवा अपंग जनावरे आदींचा विशेषत्वाने सांभाळ करणे व योग्य आहार पुरविणे आदी उपक्रम संस्थेमार्फत राबविण्याचा संस्थेचा मानस आहे. सध्या मौजे चिखली, ता.हवेली, जि.पुणे येथे गायींकरीता पत्र्याची शेड बांधून संस्थेमार्फत गोशाळा उभारण्यात आली आहे. सदर जागा अपुरी असून त्यामुळे गायींची गैरसोय होत आहे. महापालिकेच्या आरक्षणाखालील चिखली गट नं.१६५५/२ पै. आरक्षण क्र.१/७९ हे क्षेत्र चिखली गुरांच्या गोठयासाठी आरक्षित आहे. तरी या जागेत महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या नियंत्रणाखाली जागेचा ताबा पशुवैद्यकीय विभागाकडे ठेऊन चंद्रभागा गोशाळा संवर्धन संस्था ट्रस्ट, या नोंदणीकृत संस्थेस गोशाळा चालविण्यास देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.संतोष ( आण्णा) लोंढे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राजेंद्र लांडगे-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, हा जो विषय आलेला आहे तो खूपच चांगला विषय आहे. आपल्या शहरामध्ये भटकी जनावरे आहेत,गायी आहेत या गायींना आपण माता मानतो. या गायींसाठी ही संकल्पना खूप चांगली आहे.भविष्यामध्ये अजुन आपल्याला आणखी २/३ ठिकाणी गोशाळेची आवश्यकता आहे. म्हणुन माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्या शहरामध्ये अजुनही गोपालनासाठी कोणत्या संस्था पुढे येत असतील तर त्यांना आपल्या महापालिकेच्या हद्दीमधये गोशाळा उभारण्यासाठी आपण मदत करावी अशी विनंती करतो. धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, तापकीर ताई आणि बाबरताई यांनी जो विषय मांडला आहे त्याप्रमाणे आपल्या शहरात इतरही ब-याच

,

गोशाळा आहेत  त्यामध्ये चिंचवडची असेल,काळेवाडी नदीपुलाला लागुन असलेली गोशाळा असेल त्यांनाही आपल्याला  मदत करता येत  असेल तर त्याची देखील आपण नोंद घ्यावी.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  हा जो विषय आहे तो छानच आहे. त्याला मंजुरीला काही विरोध नाही. पण पिंपरी चिंचवड शहरामध्ये असलेल्या कुत्र्यांचा त्रास हा प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागामध्ये आहे. कुत्र्यांची संख्या वाढलेली आहे. प्रत्येक बिल्डींगमध्ये कुत्रे त्रास देण्याचं प्रमाण वाढलेलं आहे  तरी त्याविषयी महापालिकेचे धोरण काय आहे ते पण बघावे कारण आम्ही गाडी बोलावली तरी कुत्री घेऊन जात नाहीत.प्रभागामध्ये नागरीकांना कुत्रे चावणारांची संख्या वाढलेली आहे. तरी याबाबत प्रशासनाने योग्य ते धोरण राबवावे अशी विनंती करते.

**मा.महापौर** – संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.दगडे यांना सूचना आहेत की, त्यांनी ज्या नगरसेवकांच्या प्रभागामध्ये मोकाट कुत्रे आहेत ती पकडायची आहेत. आणि त्या कुत्र्यांची शस्त्रक्रिया करायची असेल तर ती करण्याची जबाबदारी पार पाडणेत यावी.

**मा.संदिप वाघेरे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त सन्मा.सभागृह  विषय चांगला आहे. ही संस्था गेली १०/१२ वर्षापासून गायी पाळतात. मी आयुक्त साहेबांना पत्रव्यवहार केला होता की, चिखलीमध्ये २ हेक्टर जागा आहे ती जागा ताब्यात आल्यानंतर त्या जागेला कंपाऊंड वॉल वगैरे करुन त्याचं टेंडर काढून जी संस्था येईल त्यांना देणेत यावे. आयुक्तांनी मला मागे म्हणले की, तुमच्याकडे कुठली संस्था आहे का? जेणेकरुन ती संस्था गोशाळा चालवेल. हा प्रस्ताव मंजुर करा पण याच्या बरोबरच आपल्याकडे पशुवैदयकीय अधिकारी एकच आहे ते म्हणतात की, वर्षभरात ५ ते ७ हजार कुत्र्यांची शस्त्रक्रीया केलेली आहे. एवढया शस्त्रक्रिया केल्यानंतर एवढी कुत्री कशी काय आहेत. एकच डॉक्टर वर्षभरामध्ये ७ हजार कुत्र्यांची शस्त्रक्रीया कशी काय करतो.तो कुत्री कधी पकडणार, डुकरं कधी पकडणार, त्याच्या हाताखालची माणसं झोपा काढीत असतात. मागे मी एकदा फोटो काढून व्हॉटसअप केले होते.पिंपरीतील प्रभाग हा प्राणी संग्रहालय करुन टाका साहेब, पिंपरीमध्ये वेगवेगळया ठिकाणी  ५०० ते ६०० गायी या रस्त्यावर बसलेल्या असतात. लोकांच्या गाडया खराब करतात गाडयांच्या काचा फोडतात  त्यानंतर डुकरे आहेत,कुत्री आहेत, यामध्ये एकच डॉ. दगडे काम करु शकत नाहीत त्यांना मॅन पॉवर द्या. आणि आता राहुलनी सांगितल्याप्रमाणे ज्या प्रायव्हेट गोशाळा आहेत त्यांना पण महापालिकेच्या माध्यमातून काही मदत करता आली तर ती करा.  दुसरी गोष्ट पिंपरी, चिंचवड ,भोसरीची

,

मंडई आहे.याठिकाणी भाजीपाल्यांचा जे वेस्ट मटेरीयल खाण्यायोग्य आहे ते आपली कच-याची गाडी पाठवून या गायींना आणुन खाण्यास दिलं तर त्या जनावरांना खायला पण होईल आणि त्यांचा उदरनिर्वाह पण होईल आणि गोशाळा म्हणजे जे दानशुर व्यक्ती आहेत ते वर्षातील ३६५ दिवस हे प्रत्येक जण एक,एक दिवस वाटून घेतील किंवा एकजण दोन दिवस  अस चालतंय आज पांजरपोळ आपल्याकडे आहे पण चिखली मध्ये किंवा जिथं जागा उपलब्ध असेल त्याठिकाणी किंवा ग्रीन झोनमध्ये जागा उपलब्ध असेल त्याठिकाणी किंवा आता नवीन टीपी स्कीम करतोय त्याठिकाणी जागा निर्माण करुन प्रत्येक ठिकाणी ५/५ एकर जागा निर्माण करुन हे शहरामध्ये  ३/४ ठिकाणी केले तर मोकाट जनावरांचा सुध्दा विषय संपेल. आणि शहरामध्ये जी कुत्री,डुकरं वाढलेली आहेत त्यांचा पण विषय संपलेला नाही. पुण्यातील कुत्री पिंपरी चिंचवड मध्ये सोडतात आणि पिंपरी चिंचवडमधील कुत्री पेठ पारगावच्या पुढे नेऊन सोडतात या कुत्र्यांच क्लीअर ऑपरेशन  केलं तर एवढी संख्या वाढणार नाही.  डॉ. दगडे हे क्लीअर ऑपरेशन करतात की नाही हे माहित नाही. का फक्त कान कापतात आणि सोडतात ते ही माहिती नाही. म्हणजे त्यांना प्रशासनाने मॅन पॉवर दिली तरच हा प्रश्न मिटणार आहे. तरी हा विषय मंजुर करणेत यावा अशी विनंती करतो जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त सन्मा.सभागृह  खरं तर चंद्रभागा गोशाळा संवर्धन संस्था ट्रस्ट या  संस्थेला महापालिकेतर्फे जागा देत आहोत. विषय चांगला आहे परंतु पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशी अनेक भटकी जनावरं असतील, कुत्री असतील यांची देखील व्यवस्था होणं गरजेचं आहे. डॉ.दगडे यांना  बोलावलं होतं आणि त्यांना सांगितलं होतं की, पिंपरी चिंचवड शहरातील जी कुत्री आहेत  त्या कुत्र्याना पकडून त्यांना याच पध्दतीने जागा उपलब्ध केली आणि त्याठिकाणी शहरातील सर्व कुत्री त्याठिकाणी नेऊन ठेवली आणि त्यांना आपण हॉटेलचे जे वेस्टेज अन्न आहे ते जमा करतो आणि ते अन्न त्या कुत्र्यांना खायला दिलं आणि ज्या संस्था आहेत ते या कुत्र्याला पकडण्यासाठी विरोध करतात त्या संस्थेला एखादया दिवशी मिटींगला बोलवावे आणि त्यांना सांगावे की, तुम्ही जर या कुत्र्यांच संगोपन करणार असाल तर त्यांच खाण्यापिण्याचं संस्था पाहू शकत असेल आणि भविष्यामध्ये पिंपरी चिंचवड शहरामधील भटकी कुत्री यांची वाढती समस्या आहे प्रत्येक वॉर्डमध्ये समस्या आहे. कालच कॉलेजच्या जवळ एका लहान मुलाला कुत्रं चावलं हे डॉ.दगडेंना सांगितलं पण त्यांनी कसलीही कारवाई केलेली नाही. कुत्रं पकडून नेलं तरी दुस-या दिवशी त्याच ठिकाणी सोडलं जातंय

,

कुत्र्यांची संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. आणि या विषयाला अनुसरुन एक विषय आहे आता आपल्या महापालिकेचे जे आरक्षण आहे ते आपण या गोशाळेला दिलेलं आहे त्याच पध्दतीने पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशी बरीच आरक्षणे आहेत आपण ज्या पध्दतीने या पिंपरी चिंचवड शहरामध्ये मेट्रोचं काम चालू केलं आहे, स्मार्ट सिटीचं काम चालू आहे आपण या कंपनीला प्रायव्हेट जागा भाडयाने घेऊन या कंपनीला ऑफिससाठी जागा दिलेली आहे पण जर आपले आरक्षण या कंपनीला दिले असते तर आपला खर्च वाचला असता. आपण असं का केलं नाही, की, जे पिंपरी चिंचवडचे जे आरक्षण आहेत त्या आरक्षणामध्ये मेट्रोच्या ऑफिससाठी देण्याचा प्लॅन का काढला नाही. स्मार्ट सिटीच्या ऑफिसला त्याठिकाणी का जागा दिली नाही. आपण प्रायव्हेट जागा घेऊन दिली आहे हे महापालिकेचे पैसे का खर्च करतोय. तरी हा विषय चांगला आहे या विषयाला मी अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त सन्मा.सभागृह, गोशाळेला कोणचं विरोध करणार नाही. मला फक्त एवढंच विचारायचं आहे की, जागा किती एकर आहे आणि किती वर्षासाठी करार करणार आहात. याचा उल्लेख केलेला नाही. आम्हांला पण समजलं पाहिजे की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये ही संस्था काम करीत असताना त्याचा रजिस्ट्रेशन नंबर विषयपत्रामध्ये लिहीला आहे. पण मागे एकदा तुम्ही एका मतिमंद संस्थेला जागा दिली त्या संस्थेचा रजिस्ट्रेशन नंबर लिहीला नव्हता तरी आम्ही गप्प बसतो कारण मतिमंद मुलांच्या संस्था बाहेर आल्या पाहिजेत आणि त्यांनी चांगल काम केलं पाहिजे म्हणुन माझ्यासारख्या महिलेने विरोध केला नाही. कारण मी मतिमंद मुलांची संस्था चालवते. परंतु या गोशाळेच्या संस्थेला जागा किती देणार आहात, किती वर्षासाठी देणार आहात, काय, काय मदत देणार आहात हे सभागृहाला पण समजलं पाहिजे. आताच सांगितलं की, नगरसेवक सुध्दा इथ एका दिवसाचं जेवण देवु शकतात. आज रस्त्यावर किती तरी गायी बसलेल्या असतात त्यांना लोक एक गवताची गड्डी लगेच देतात. म्हणजे हे खूप ठिकाणी चालतंय मग पिंपरी चिंचवडसाठी अशी काही लोक आहेत त्यांच्यासाठी वेबसाईट चालवावी. की, इथे मोकाट गायी,म्हशी असतील,अपंग जनावरे असतील त्यांना सुध्दा सांभाळण्याचं काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका करणार आहे. आणि त्याच्यासाठी तुम्ही सीएसआर मधुन तुम्हांला फंडस मिळतील. तरी या संस्थेला किती जागा देणार आहोत ५ एकर जागा देणार आहे का? १० एकर जागा देणार आहे हे आम्हांला कळलं पाहिजे. आणि त्यांच्या बरोबर किती वर्षाचा करार करणार आहोत.

,

दगडे काय करणार आहेत ते तिथं जाऊन बघणार आहेत का? त्या संस्थेला १० एकर जागा देणार असाल तर ५ एकर जागेमध्ये गवत लावून द्या. हे सगळं व्यवस्थित कळलं पाहिजे. आणि हा व्यवसाय सुध्दा झालेला आहे. आज व्यवसाय असा आहे की, गायीचं गोमुत्र, गायीच्या शेणापासून गवरी तयार करतात त्याच्यावर तुप लावून संध्याकाळी दिवा लावतात. म्हणजे सगळया गोष्टींसाठी वापर केला जातो. आणि लोक त्यांच्याकडून गवरी घेऊन जातात. मा.महापौर साहेब, अजुन एक विषय निघाला आम्ही बघीतलेलं आहे की, ज्या कुत्र्यांच्या संस्था आहेत माझ्या माहितीप्रमाणे काल स्टँडींग मध्ये कुत्र्याचं ऑपरेशन करण्याकरीता २ कोटीचा विषय झाला. माझं म्हणणं आहे की, मागील कमीत कमी ७ वर्षाचा अहवाल द्या ७ वर्षापुर्वी शहरामध्ये एकुण किती कुत्री होती, किती कुत्र्यांच ऑपरेशन झालं, दरवर्षी ती कुत्री कशी वाढतात आणि दरवर्षी ऑपरेशनसाठी किती खर्च करणार आहोत. ऑपरेशन करु नये या मताशी मी नाही. स्टँडींगने विषय केला त्याच्याबद्दल पण माझं काही म्हणणं नाही. पण दरवर्षी २ कोटी खर्च करण्याइतके ऑपरेशन होतात का? आणि जर होत असतील तर त्याचा अहवाल दरवर्षी सादर केला पाहिजे. पर्यावरणाचा जसा अहवाल येतो तसा यांना आपण दरवर्षी करोडो रु.देतो तर यांचाही अहवाल आला पाहिजे.शहरामध्ये पाच वर्षापुर्वी किती कुत्री होती आणि त्यामध्ये किती ऑपरेशन झाली आहेत तिथंपर्यंत या सगळया गोष्टी थांबल्या गेल्या नाहीत का? या गोष्टी कुठं तरी थांबल्या पाहिजेत नां परत, परत त्यावर खर्च कसा काय होतो. आणि कुत्री पकडणारी जी लोक आहेत, त्यांच्या ज्या संस्था आहेत कुत्री पकडल्यानंतर त्यांच ऑपरेशन न करता फक्त कान कटींग करतात का? एक जर कुत्री व्याली तर ७/८ पिल्ले त्यानंतर डुकरं पकडणारी जी लोक आहेत त्यांना बोलवा नागरीकांना त्याचा खूप त्रास होत आहे जी लोक डुकरं पाळतात आणि जी खाण असते त्या खाणीमध्ये डुकरं सोडून गेलेली आहेत. त्या डुकरांना तिथं काही खायला मिळालं नाही की, ती संध्याकाळी वर येतात. त्या माणसांच्या उपजिवीकेचं हे साधन आहे हे माहित आहे आणि या लोकांची किती दादागिरी असते, भांडण मारामा-या करीत असतात मग यांच्यावर शेवटचा उपाय काय आहे. ही लोक डुकरं किती सोडतात, का सोडतात हे पण त्यांनी सांगितलं गेलं पाहिजे. हा विषय शहराच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. गायींसाठी जसं आपण गोशाळा करता तसं या कुत्र्यांसाठी सुध्दा केलं पाहिजे. जी खराब झालेली कुत्री आहेत त्यांना सुध्दा १/२ दिवसापेक्षा जास्त दिवस ठेवत नाहीत. ही कुत्री लांब नेऊन सोडतात असं यांनी सांगितलं पण अजिबात सोडत नाहीत. तुमचा काही तरी गैरसमज आहे. दुसरीकडे सोडत नाहीत फार, फार तर पिंपरीचे माझ्याकडे आणि माझ्याकडचे पिंपरीला

,

सोडतात दुसरीकडे सोडण्याची त्यांना तशी परमिशन पण नाही. ऑपरेशनसाठी एवढा खर्च का लागतो. ऑपरेशन करणा-या ज्या संस्था आहेत त्या ऑपरेशन सक्सेस करता की नाही. याच्यावर कोणाचं कंट्रोल आहे की**,** नाही याबाबतीत कमिशनर साहेब आणि महापौर साहेबांनी खुलासा करावा. गोशाळेला जी जागा देणार आहात ती किती वर्षासाठी देणार आहात आणि किती एकर देणार आहात आणि त्यांनी जर चांगले काम केले नाही तर त्यांच्याकडुन जागा काढुन घेण्याची तरतुद यामध्ये ठेवली आहे की नाही. नाही तर ते काय निवांत होतील आम्हांला १५ वर्षासाठी दिलं आहे म्हणुन. याचा खुलासा करावा आणि कुत्र्यांचा हा विषय निघालेला आहे. रस्त्यावर जी जनावरे बसलेली असतात ती सुध्दा या गोशाळेमध्ये गेली पाहिजे. दगडेंना तुम्ही बोलवून घ्या.त्यांना समजू दे ते काय काम करतात. कुत्रे व डुकरी पकडण्याचं काम करतात की नाही, मा.महापौर या विषयाचा डिटेल खुलासा झाला पाहिजे.

**मा.महापौर** – डॉ.दगडे यांना सूचना आहेत की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये किती कुत्री आहेत, किती डुकरे आहेत, किती कुत्र्यांची शस्त्रक्रिया झालेली आहे याची सविस्तर माहिती द्यायची आहे.

**मा.नितीन काळजे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त सन्मा.सभागृह, विषय चांगला आहे परंतु आपण शहरामध्ये पहातो आहे की, शहरामध्ये अशा भरपूर गायी आहेत की, या मोकाट जनावरामध्ये फिरत असतात त्याच बरोबर बैल सुध्दा असतात मी तर म्हणतो की, फक्त गायीसाठीच नाही तर अजुनही अशा काही संस्थांना जागा देवुन त्याठिकाणी इतर जनावरे सुध्दा त्याठिकाणी ठेवणेत यावीत. च-होलीला सुध्दा एक चांगलं आरक्षण आहे एक कॅटल शेडचं पण आहे ते ताब्यात घेऊन एखादया चांगल्या संस्थेला देवुन आपल्या शहरातील जी भटकी जनावरे आहेत ती त्याच्यामध्ये ठेवणेत यावीत. मंगलाताई पण म्हणल्या की, इकडची कुत्री तिकडे सोडतात तिकडची कुत्री इकडे सोडतात पुर्वी असंच व्हायचं इकडची कुत्री कचरा डेपोमध्ये आणुन सोडायचे आता काय झालं आहे कुत्री तिथल्या तिथं नेऊन सोडतात ती कुत्री काही कमी होत नाहीत परंतु नानांनी सुध्दा सांगितले आहे की, या कुत्र्यांसाठी काही तरी सोय केली पाहिजे. आयुक्त साहेबांनी प्राण्यांसाठी ज्या संस्था काम करतात त्या संस्थांना बोलवून घ्यावं कारण आपण कुत्र्यांना काही करायला गेलं की, या संस्था आडव्या येतात चांगलं काम करतात परंतु त्यांचा काही तरी विषय होतो की, हे कुत्र्यांना त्रास देतात परंतु आपल्याकडे अशा जर काही जागा असतील, संस्था असतील तर याच्यामध्ये आपण एक काम करावं की, २/३ एकर जागा

,

बघुन त्यामध्ये अशी भटकी कुत्री त्याठिकाणी ठेवणेत यावीत. कुत्री पकडणारी जी आपले कर्मचारी आहेत ती आपल्याकडे असलेल्या डोंगराळ भागात कुत्री आणुन सोडतात. तरी आपल्याला विनंती आहे की, या भटक्या कुत्र्यांसाठी पण एखादया संस्थेला जागा देणेत यावी.

**मा.संतोष (आण्णा) लोंढे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त सन्मा.सभागृह, मोकाट जनावरांच्या बाबतीत सांगायचं म्हणल तर गेल्या १५/२० वर्षापुर्वी महापालिकेच्या माध्यमातून कोंडवाडा केला जायचा रस्त्यावर जी मोकाट जनावरं असायची त्यांच संगोपन त्याठिकाणी करायचं तर पुढील काळासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून आज आपण गोशाळेला जी जागा देत आहोत याच्या बाबतीत आमचं काही दुमत नाही पण सांगण्याच तात्पर्य आहे की, शहरामध्ये ८ प्रभाग आहेत या प्रभागाच्या अखत्यारीत जी,जी मोकाट जनावरे असतात त्यांच्यासाठी ८ ही प्रभागामध्ये गोशाळेच्या माध्यमातून त्या जनावरांच संगोपन त्याठिकाणी करण्यात यावं अशा विविध ठिकाणी आरक्षीत जागा आहेत त्याठिकाणी गोपालनाचा कार्यक्रम आयोजित केला तर आपल्या शहरामध्ये सध्या जे विद्रुपीकरण दिसत आहे कारण हल्ली आता पावसाळयाचे दिवस आहेत या जनावरांचे रस्त्यावर जे शेण पडलेलं असतं त्यामुळे अनेक अपघात होत असतात असे अपघात भोसरीच्या पुलाखाली घडलेले आहेत तेंव्हा आयुक्तांना विनंती करतो की, ८ ही प्रभागामध्ये ज्याठिकाणी आरक्षीत जागा आहेत त्याठिकाणी आपण गोपालनाचे आदेश देण्यात यावेत. गोपालनासाठी महापालिकेने खारीचा वाटा  उचलण्यास काहीच हरकत नाही. दुसरी गोष्ट डॉ.दगडेंच्या माध्यमातून काहीच काम होत नाही. भोसरीमध्ये असंख्य भटकी कुत्री व डुकरं पण आहेत कुत्री पकडणारी जी संस्था येते त्या संस्थेला एक सुध्दा कुत्रं पकडता येत नाही. त्यांच्या बाबतीत ब-याच वेळा तक्रारी केलेल्या आहेत किती कुत्री पकडली त्याचं व्हीडीओ शुटींग करुन लेखाजोखा ठेवणं गरजेचं आहे. पण आजपर्यंत अस काही झालेलं नाही. यामध्ये सुधारणा होणं गरजेचं आहे. आज आपण स्मार्ट सिटीच्या माध्यमातून प्रवेश करतो आहे. तरी या माध्यमातून याचा बंदोबस्त होणं गरजेचं आहे. एवढीच माझी विनंती आहे.

**मा.डॉ.दगडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त सन्मा.सभागृह, सदरचा विषय हा गोशाळेचा आहे हा विषय या विभागाने प्रस्तावित केला नसल्याने त्याची माहिती डिटेल सांगता येणार नाही. सदरची जागा ही कोंडवाडा यासाठी २ हेक्टर जागा आरक्षीत आहे. शहरामध्ये असलेल्या भटक्या जनावरांची समस्या सोडवण्यासाठी कोंडवाडा तयार करुन त्यांच

,

संगोपन करण्यासाठीचा आलेला विषय दिसतो आहे. सध्या भटकी जनावरं पकडून पांजरपोळ येथे सांभाळ करीत होतो परंतु त्यांच्याकडे जनावरांची संख्या जास्त झाल्याने ते आता जनावरं घेत नाहीत त्यामुळे ही समस्या निर्माण झाल्याने हा विषय आलेला आहे. दुसरा जो विषय आहे कुत्र्याचा आपल्याकडे गेल्या वर्षभरात दोन संस्थांची नियुक्ती केली होती आणि कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्याकरीता शस्त्रक्रीया करण्याचा कार्यक्रम दोन संस्था मार्फत राबवित आहोत. केंद्र शासनाच्या आणि सुप्रीम कोर्टाच्या नियमानुसार कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी त्यांचे ऑपरेशन करुन ते कुत्रे मुळ ठिकाणी सोडले जातात त्यामुळे कदाचित संख्या घटत नसेल संख्या नियंत्रणासाठी आपण शस्त्रक्रीया करतो आणि ती कुत्री मुळ ठिकाणी सोडतो या कुत्र्यांची संख्या लगेच नियंत्रणात येणार नाही. कारण शस्त्रक्रीया केल्यानंतर त्याचा २ ते ३ वर्षानी त्याचा इफेक्ट जाणवेल. आपण डुकरं पकडण्यासाठी नवीन संस्थांची नियुक्ती केलेली आहे त्यांनी गेल्या १० दिवसामध्ये २३३ डुकरं पकडली होती परंतु मालकाच्या हल्ल्यामुळे आणि काही गोष्टीमुळं हे काम थांबवलेलं आहे.

**मा.मंगला कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह याच्यामध्ये त्यांनी म्हणले आहे की, ऑपरेशन करुन मुळ जागी सोडतो पहिलं तर त्यांच वाक्य चुकलंच होतं. इफेक्ट होत नसेल, दुस-या वेळेस ते काय उत्तर देतात की, संख्या कमी व्हायला २/३ वर्ष लागेल. मी दगडेला टारगेट करीत नाही. मी आजपर्यंत कोणत्याही अधिका-याला टारगेट केलेलं नाही. प्रशासनाची दोन चाके असतात दोघांनी मिळून काम केलं तर काम होत असतात. दगडे हे डॉक्टर आहेत, काही साधेसुधे नाहीत त्यामुळे मी त्यांना टारगेट करीत नाही. मला त्यांनी कोंडवडयाची २ हेक्टर जागा सांगितलेली आहे.म्हणजे ५ एकर जागा झाली मग ही ५ एकर जागा तुम्ही कोंडवडयासाठी देणार का? त्याठिकाणी महापालिकेने शेड का बांधली नाही. आपल्याला हे दिसलं नाही का, या संस्थेला तुम्ही ५ एकर जागा देणार असाल तर किती वर्षासाठी देणार आहोत हे पण सांगितलेलं नाही. त्यांनी सांगितल की,कोंडवाडयासाठी जी जागा आहे ती या संस्थेला देणार आहात हा अर्धवट खुलासा झाला हा विषय सदस्य प्रस्ताव आहे आणि त्यामध्ये २ हेक्टर जागा देणार असं म्हणल आहे. असे बरेचसे सदस्य प्रस्ताव येतात आणि तुम्ही ते मंजुर करणार आहात का? याचा खुलासा करावा. मा.महापौर साहेब, आम्हांला हे उत्तर पटलेलं नाही. त्यांना मी ५ वर्षाचा कुत्र्याचा अहवाल देण्यास सांगितला होता. त्यांना जज्मेंट यायला पाहिजे होतं ते मागच्या ५ वर्षामध्ये असतील, नसतील पण किमान

,

मागच्या ३ वर्षाचा तरी खुलासा द्यायला हवा होता. किंवा ते ज्या वर्षापासून आहेत तिथपर्यंतचा तरी खुलासा द्यायला पाहिजे होता. ते दिवसभरामध्ये किती कामकाज करतात हे त्यांना तोंडपाठ असलं पाहिजे. माहित नसेल तर हा विषय तहकुब ठेवा.

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर हा विषय हा गोपालनाचा आहे आणि चर्चा केली ती कुत्र्याच्या संदर्भात केलेली आहे. खरंतर या विषयाच्या अनुषंगाने गायीचे संरक्षण झालं पाहिजे, संवर्धन झालं पाहिजे. गोमातेचे रक्षण केलं पाहिजे. हा विषय खुप चांगला आहे. त्यामुळे माझ्या आगोदरच्या ज्या,ज्या वक्त्यांनी चर्चा केली त्या मताशी मी सहमत आहे आणि मंगलाताईनी केलेली सूचना चांगली आहे किती जागा देणार आहोत, किती वर्षासाठी देणार आहोत. किती वर्षाचा करार करणार आहोत. आणि ताईंनी दुस-या एका प्रश्नाला वाचा फोडली कुत्र्यांच्या संदर्भामध्ये, ताई खरं आहे, मी तुमच्या मताशी १०० टक्के सहमत आहे गेल्या ७/८ वर्षापासून आपण कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करतो आणि शस्त्रक्रीया केल्यानंतर त्यामध्ये ८० टक्के यश मिळालं खरंतर हा खुप महत्वाचा विषय आहे. कुत्र्यांची शस्त्रक्रिया केल्यानंतर कुत्र्याची संख्या शहरामध्ये का वाढते. हा खरं तर संशोधनाचा विषय आहे. याचा अर्थ आपण शस्त्रक्रिया करतो ती चुकीची करतो. ताई तुम्ही तर ५ वर्षाचं म्हटलं पण मी तर म्हणतो की, गेल्या १० वर्षापासून हे काम सातत्याने करतो आहे निश्चितच कुत्र्यांच्या संदर्भामध्ये ही संख्या वाढली नाही गेली पाहिजे. तुमच्या मताशी आम्ही सहमत आहे. म्हणजे खरंतर या कुत्र्याच्या संदर्भामध्ये पुढच्या काळामध्ये या कुत्र्यावर नियंत्रण ठेवायचं असेल तर आयुक्त साहेब मी तुम्हांला दोन/तीन महिन्यापूर्वी सांगितलं होतं की,दिल्लीमध्ये अशी एखादी संस्था आहे का? सगळे कुत्रे / कुत्री हे वेगवेगळे राहतील त्यामुळे रस्त्यावर राहणार नाहीत.अशा पध्दतीची जर सोय आपल्या शहरामध्ये झाली तर कुत्र्यासाठी वेगळी सोय करा आणि कुत्रीसाठी वेगळी सोय करता आली तर बघा. या कुत्र्याच्या संदर्भामध्ये आपण अधिक माहिती घेण्याकरीता हा विषय पुढच्या महापालिका सभेमध्ये घेणेत यावा. विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.अशी सूचना मी मांडतो.

**मा.सुरेश भोईर** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता---

,

ठराव क्रमांक -४६० विषय क्रमांक- ५

दिनांक २०/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.११
दि.३१/८/२०१९

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ज्ञानदेव थोरात** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ६

दिनांक २०/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .
क्र.आमुका/२/कावि/४२९/२०१९ दि.१९/०८/२०१९
२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .
क्र.आमुका/२/कावि/४३०/२०१९ दि.१९/०८/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५४ दि.७/९/२०१९

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत राज्यातील महानगरपालिका /नगरपरिषदा/नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी लागू करण्याबाबत दि.११ जुलै २०१९ रोजी शासन निर्णय निर्गत करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्य शासनामार्फत तयार करण्यात आलेले उपविधी आदेशाचे दिनांकापासून राज्यातील सर्व महानगरपालिका /नगरपरिषदा/नगरपंचायतींसाठी लागू झालेले असून त्याकरिता महापालिका सभा ठरावाची अथवा स्वतंत्र मान्यता घेण्याची आवश्यक नसल्याचे त्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयानुसार दि.१ जुलै २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेची अंमलबावणी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

,

सदर उपविधीमध्ये अनुसूची – १, भाग अ मध्ये उपयोगकर्ता शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| **महानगरपालिका** | | | |
|---|---|---|---|
| **क्र.** | **वर्गवारी** | **अ व ब वर्ग** | **क व ड वर्ग** |
| | घनकचरा निर्मिती १०० किलोग्राम पेक्षा कमी | **(रक्कम रुपये प्रतिमहा)** | |
| १ | प्रति घर | ६० | ५० |
| | **व्यावसायिक आस्थापना** | | |
| २ | दुकाने, दवाखाने इत्यादी | ९० | ६० |
| ३ | शोरुम<br>(उपकरणे / फर्निचर / ऑटोमोबाईल / इलेक्टॉनिक्स इ.) | १६० | १२० |
| ४ | गोदामे | १६० | १२० |
| ५ | उपहारगृहे व हॉटेल | १६० | १२० |
| ६ | राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल | २०० | १६० |
| | **रुग्णालये** | | |
| ७ | पन्नास खाटांपेक्षा कमी | १६० | १२० |
| ८ | पन्नास खाटांपेक्षा जास्त | २४० | १८० |
| | **संस्था** | | |
| ९ | शैक्षणिक संस्था, वसतीगृहे | १२० | ९० |
| १० | धार्मिक संस्था | १२० | ९० |
| ११ | शासकीय / निमशासकीय कार्यालये | १२० | ९० |
| १२ | विवाह कार्यालये / मनोजरंजन सभागृहे / एकपडदा चित्रपटगृहे | २००० | १००० |
| १३ | खरेदी केंद्र / बहुपडदा चित्रपटगृहे | २००० | १००० |
| १४ | फेरीवाले | १८० | १५० |

,

| | | |
|---|---|---|
| १५ | हंगामी दुकाने किंवा आनंद मेळा / सत्संग / खाद्य महोत्सव / फटाक्याचे दुकान | स्थानिक स्वराज्य संस्थांनी मासिक शुल्क न आकारता एक वेळ शुल्क निर्धारित करावे |

तसेच सदर उपविधीमध्ये अनुसूची – १, भाग ब (शास्तीची अनुसूची) मध्ये कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी शास्ती निर्धारित करण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| **कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी शास्ती (किमान शास्ती रुपयांमध्ये)** | | | |
| **महानगरपालिका** | | | |
| **क्र.** | **तपशिल** | **अ व ब वर्ग** | **क व ड वर्ग** |
| **विलगीकरण, साठवणुक, कचरा सुपुर्द करणे व संकलन याबाबतचे उल्लंघन** | | | |
| १ | विलगीकरण न केलेला व वेगळया डब्यांमध्ये साठवण न केलेला कचरा सोपविल्याबद्दल | | |
| | अ) घरातुन / व्यवसायिक आस्थापना | | |
| | पहिला प्रसंग | ३०० | २०० |
| | नंतरचा प्रत्येक प्रसंगी | ५०० | ३०० |
| | ब) मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक | | |
| | पहिला प्रसंग | ५००० | ३००० |
| | नंतरचा प्रत्येक प्रसंगी | १५००० | ९००० |
| २ | कचरा जाळण्याबद्दल | ५००० | ५००० |
| **विशिष्ठ वर्गवारी परिस्थिती /** | | | |
| ३ | सार्वजनिक सभा समारंभ संपल्यावर चार तासांच्या आत / स्वच्छता न केल्याबद्दल | स्वच्छता अनामत रक्कम जप्त करणे | |

,

वरील अनुसूची - १, भाग अ, उपयोगकर्ता शुल्क तक्त्याचे अवलोकन करता अ व ब वर्ग महानगरपालिकांसाठी निर्धारित करण्यात आलेल्या शुल्कानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्येदेखील सदर शुल्क लागू करणे तसेच कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी शास्ती म्हणून निर्धारित करण्यात आलेले शुल्क लागू करणे आवश्यक असल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत आदेश क्र. आमुका/२/कावि/४२०/२०१९ दि.१६/०८/२०१९ अन्वये सदर शासन निर्णय लागू करण्याचा आदेश निर्गत करण्यात आलेले आहे.

सदर शुल्क व शास्ती लागू झाल्यानंतर जमा होणारी शुल्काची रक्कम भरणा करण्याकरिता विभागाकडे लेखाशिर्ष उपलब्ध नसल्यामुळे आरोग्य मुख्य कार्यालयामध्ये उपयोगकर्ता शुल्क वसुली साठी नविन लेखाशिर्ष तयार करणे आवश्यक आहे.

सबब नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत दि.११ जुलै २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), अन्वये लागू करण्यात आलेले स्वच्छता व आरोग्य उपविधी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता लागू करणेकामी तसेच कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी निर्धारित शास्तीच्या रकमेचा भरणा करणेकामी “उपयोगकर्ता शुल्क वसुली व शास्ती” या नावाने नविन लेखाशिर्ष निर्माण करणेकामी तसेच सदर शासन निर्णयाची अंमलबावणीकामी निर्गत करण्यात आलेला आदेशाचे अवलोकन करणेत यावे.

**मा. संतोष (आण्णा) लोंढे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह विषय क्रमांक ६ दसरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा. सुरेश भोईर** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

,

ठराव क्रमांक - ४६१ विषय क्रमांक- ६
दिनांक २०/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .
क्र.आमुका/२/कावि/४२९/२०१९ दि.१९/०८/२०१९
२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .
क्र.आमुका/२/कावि/४३०/२०१९ दि.१९/०८/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५४ दि.७/९/२०१९

विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह विषय क्रमांक ७ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक-७
दिनांक -२०/९/२०१९ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१७/२०/२०१९
दि.०८/०८/२०१९

पिंपरी चिंचवड मनपाची मंजुर विकास योजना सुधारित करणे या कामासाठी सर्वेक्षण करुन विद्यमान जमिन वापर नकाशा व इतर कामे खाजगी संस्थेमार्फत करुन घेणे, याकामी निविदा प्रसिध्द करणेस मा.महापालिका सभा ठराव क्र.४०८ दि.२१.११.२०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे, तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र.११८ दि.०५.०२.२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संपुर्ण क्षेत्राची (जुन्या व वाढीव हद्दीसाठी) विकास योजना तयार करणेचा ठराव पारित केलेला आहे. त्यानुसार निविदा कार्यवाही करुन खाजगी संस्थेची नेमणुक करण्यात आली आहे. सदर संस्थेस दि.०८.०३.२०१९ रोजी कामाचे आदेश दिलेले आहेत.

,

शासनाच्या नगर विकास विभागाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मंजूर विकास योजना सुधारित (दुस-यांदा) करण्याकरिता उपसंचालक, नगररचना यांच्या अधिपत्याखालील विकास योजना विशेष घटक कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका, व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण घटक या अभिनामाने स्थापन झालेले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ ते कलम ३१ प्रामुख्याने सुधारीत विकास योजना तयार करण्याशी निगडीत आहेत. त्यानुसार प्रथमतः महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ ते कलम २३ सह कलम ३८ अन्वये मंजूर विकास योजना सुधारीत करणे बाबतचा, इरादा जाहीर करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. सदर विकास योजनेत समाविष्ठ असलेल्या क्षेत्राचा हद्दी दर्शवणारा व मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी स्वाक्षांकीत केलेला नकाशा, महापालिकेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळी नागरीकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात येईल.

सुधारित विकास योजना तयार करण्याचा महापालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस मा.महापालिका सभेची मान्यता मिळावी. सदरची सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ६० दिवसाच्या कालावधीत प्राप्त होणा-या नागरीकांच्या सुचना/हरकतीचा विचार विकास योजना तयार करतांना करण्यात येईल.

२) तसेच विकास योजनेचे सर्व वैधानिक कामकाज करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २४ नुसार उपसंचालक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण घटक, पिंपरी-पुणे यांची “नगररचना अधिकारी” म्हणुन नेमणुक करण्यास मा.महापालिका सभेची मान्यता मिळावी. तदनतंर “नगररचना अधिकारी” नेमणुकीस मा.सहसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांची पुर्व मंजुरी घेऊन “नगररचना अधिकारी” यांचे नियुक्तीचे आदेश मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे मार्फत पारित करण्यात येतील.

,

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मंजुर विकास योजना सूधारित करण्याची सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास व त्या अनुषंगीक येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा. संतोष (आण्णा लोंढे)** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.
**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/१७/३८/२०१९ दि.२०/०९/२०१९ चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्रमाक ७ वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत यावी. अशी सूचना मी मांडतो.
**मा.विलास मडिगेरी** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, सूचना स्विकारली आहे.
यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता---

ठराव क्रमांक -४६२ विषय क्रमांक-७
दिनांक -२०/९/२०१९ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१७/२०/२०१९
दि.०८/०८/२०१९

मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/१७/३८/२०१९ दि.२०/०९/२०१९ चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्रमाक ७ वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

अनुकुल- ८१ प्रतिकुल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

,

विषय क्रमांक-८

दिनांक २०/९/२०१९ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/१८५/२०१९ दिनांक ५/०९/२०१९

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,१४,९६१/- व ९,१०,५४,९७४ /- असे एकुण र. रु १४,०३,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येत लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०८/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | १७३२२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या | १७३२२ | |

,

| | | | |
|---|---|---|---|
| संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १४७५६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१४७५६ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-१००८९<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम -४६६७ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | १०५८७ लाभार्थी | GOI+GOM=६३५.२२लाख | GOI =२०००/- व GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB = २११.७४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८४६.९६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ९९०२ लाभार्थी | GOI+GOM=५९४.१२लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१९८.०४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७९२.१६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत यावा.

**मा.संतोष ( आण्णा) लोंढे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबु** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे टाटा एस वाहनांच्या

,

लोडबॉडीचे बाबत मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे कडील पत्र क्र.जा.क्र.आमुका/३/कावि/६०९/२०१८ दि.६/१२/१८ अन्वये टाटा एस वाहनांच्या लोडबॉडी भंगार/निरुपयोगी असल्याने लिलावात काढण्याबाबत कळविले आहे. तसेच आकाशचिन्ह परवाना विभाग याचें मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनाधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, लोखंडी स्ट्रक्चर इत्यादी साहित्य जप्त करून नेहरूनगर कोठारमध्ये जमा करण्यात आलेले आहे.

सदर भंगार/निरुपयोगी साहित्याचे मुल्यांकन होणे आवश्यक होते. त्यानुसार सदर कामी म.न.पा. मार्फत नियुक्त शासकीय मुल्यांकनदार मे.ए.व्ही.शेवडे.ऍन्ड एसोशियट पुणे. यांना मुल्यांकन करणेकामी आदेश निर्गत करण्यात आले होते. त्यानुसार यांचेकड़ुन प्रत्यक्ष पहाणी करुन उक्त भंगार साहित्याचे अंदाजे मुल्यांकन किंमत र.रु 23,62,500/- ( अक्षरी र.रु. तेवीस लाख बासष्ठ हजार पाचशें फक्त) मुल्यांकन काढणेत आलेले आहे.

प्रस्तुत किंमत चालू बाजारभाव गृहीत धरुन अंदाजे काढण्य़ात आलेली आहे. उक्त भंगार साहित्याची किंमत अंदाजे असल्याने प्रत्यक्ष खुल्या लिलावात कमी / जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत साहित्याची विक्री/विल्हेवाट ई-लिलावाव्दारे करणे प्रस्तावीत आहे. सदर लिलावासाठी महानगरपालिका अति. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, सहा.आयुक्त (भांडार), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, भांडार अधिकारी व संबधित विभागाचा शाखाप्रमुख यांची लिलाव समिती गठीत करण्यात आली आहे. सदर विषयास लिलाव समितीने दि २८/८/२०१९ रोजी वरील भंगार साहित्याची विक्री ई-लिलावाव्दारे करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदर भंगार साहित्याची शासकीय मुल्यांकनानुसार अंदाजे किंमत र.रु. 23,62,500/- ( अक्षरी र.रु. तेवीस लाख बासष्ठ हजार पाचशें फक्त) मुल्यांकन काढणेत आलेले आहे. उपरोक्त नमुद केलेनुसार महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम मधील कलम ७९(क) नुसार महापालिकेची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता विक्री करणेस मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार उक्त भंगार साहीत्याची ई-लिलावाव्दारे विक्री करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड शिक्षण विभागाकडील सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये अपुरी तरतुद असलेल्या कामाकरिता वाढ/घट करून तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

,

| अ.क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र. | सन२०१९-२० ची तरतूद र.रु. | घट र.रु. | वाढ र.रु. | सन२०१९-२०चा सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाचे शाळांना आयएसओ ९००१-२०१५ नामांकन प्रमाणपत्र मिळणेकामी. | सर्वांगिक शैक्षणिक गुणवत्ता व विकास | क्र.३०४ अ.क्र. ४० | २०,००,०००/- | ० | ४३,०००००/- | ६३,००,०००/- |
| २ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५,००,००,०००/- | ४३,०००००/- | | |
| | | | | | - | | |

तसेच ग प्रभागातील प्रभाग क्र. २३ मधील मनपाच्या सन २०१९-२० च्या नवीन अंदाजपत्रकात स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तीक घरगुती शौचालय लाभर्थीनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/संस्था/ एजन्सी यांनी बांधकाम केलेल्या शौचालयाच्या गुणवत्ता तपासणीसाठी मे. इंडियन रजीस्टर ऑफ शिपींग (IRS) या संस्थेची त्रयस्थ संस्था/एजन्सी म्हणून नेमणूक करणे व तपासणी शुल्क अदा करणे गरजेचे आहे. त्यादृष्टिने भांडवली मुख्यालय-लेखाशिर्षातील कामांची प्रशासकीय मान्यता व तरतूद अत्यंत कमी असल्याने प्रभागातील भांडवली मुख्यालय कामांची निविदा काढलेनंतर संपुर्ण व्याप्तीचे काम होणे शक्य होणार नाही त्यामुळे खालील समावेश केलेल्या कामांची सन २०१९-२० मध्ये खर्च होणारी आवश्यक तरतूद वाढवून देणेस मान्यता देणेत यावी.

,

| अ. क्र. | लेखाशिर्ष/ कामाचे नाव | पानांक | कामाचा अनु. क्र. | लेखा शिर्ष/ कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० ची तरतूद | वाढ करावयाची तरतूद रक्कम रुपये | घट करावयाची तरतूद रक्कम | वाढ/घट केले नंतर सन २०१९-२० ची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तीक घरगुती शौचालय लाभर्थीनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/संस्था/ एजन्सी यांनी बांधकाम केलेल्या शौचालयाच्या गुणवत्ता तपासणीसाठी मे. इंडियन रजीस्टर ऑफ शिपींग (IRS) या संस्थेची | | | | ५०००० | ० | १००००० | ० | १००००० |

,

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | त्रयस्थ संस्था/एजन्सी म्हणून नेमणूक करणे व तपासणी शुल्क अदा करणे | | | | | | | | |
| २ | प्रभाग क्र. २३ मध्ये बापुजीबुवानगर व गावठाण परिसरातील रस्ते खडीमुरुम पध्दतीने विकसीत करणे (सन २०१९-२० साठी) | २३० | १ | भांडवली कामे | २५००००० | १७००००० | ० | १००००० | १६००००० |
| | एकूण | | | | ३०००००० | १७००००० | १००००० | १००००० | १७००००० |

तसेच स्थापत्य ई प्रभागाकडील सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात खालील कामाकरिता उपलब्ध असलेली तरतूद अपुरी आहे. सदर काम पूर्ण करणे साठी पुरेशी तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी खालील प्रमाणे वाढ/घट करून तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

,

| अ क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र.अ.क्र. | सन २०१९-२० ची तरतूद र.रु. | घट र. रु | वाढ.र.रु | सन २०१९-२० चा सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे आळंदी रस्ता ते दाभाडे वस्ती ४५ मी.डी. पी. रस्ता विकसित करणे. | विशेष योजना | २०/६८ | ३००००० | - | ६०,००००० | ६३,०००००/- |
| २ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५००००००० | ६०००००० | | |

**मा. सुरेश भोईर** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात**- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारलेली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ४६३ विषय क्रमांक- ८
दिनांक-२०/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/१८५/२०१९ दिनांक ५/०९/२०१९

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

,

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,१४,९६१/- व ९,१०,५४,९७४ /- असे एकुण र. रु १४,०३,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०८/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १७३२२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १७३२२ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १४७५६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१४७५६ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- १००८९<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४६६७ |

,

| | | | |
|---|---|---|---|
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | १०५८७ लाभार्थी | GOI+GOM=६३५.२२लाख | GOI =२०००/- व GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB = २११.७४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८४६.९६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला<br>दुसरा हप्ता | ९९०२ लाभार्थी | GOI+GOM=५९४.१२लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =१९८.०४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७९२.१६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे टाटा एस वाहनांच्या लोडबॉडीचे बाबत मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे कडील पत्र क्र.जा.क्र.आमुका/३/कावि/६०९/२०१८ दि .६/१२/१८ अन्वये टाटा एस वाहनांच्या लोडबॉडी भंगार/निरुपयोगी असल्याने लिलावात काढण्याबाबत कळविले आहे. तसेच आकाशचिन्ह परवाना विभाग यांचे मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनाधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, लोखंडी स्ट्रक्चर इत्यादी साहित्य जप्त करून नेहरूनगर कोठारमध्ये जमा करण्यात आलेले आहे.

सदर भंगार/निरुपयोगी साहित्याचे मुल्यांकन होणे आवश्यक होते. त्यानुसार सदर कामी म.न.पा. मार्फत नियुक्त शासकीय मुल्यांकनदार मे.ए.व्ही.शेवडे.ऍन्ड एसोशियट पुणे. यांना मुल्यांकन करणेकामी आदेश निर्गत करण्यात आले होते. त्यानुसार यांचेकडुन

,

प्रत्यक्ष पहाणी करुन उक्त भंगार साहित्याचे अंदाजे मुल्यांकन किंमत र.रु 23,62,500/- (अक्षरी र.रु. तेवीस लाख बासष्ठ हजार पाचशें फक्त) मुल्यांकन काढणेत आलेले आहे.

प्रस्तुत किंमत चालू बाजारभाव गृहीत धरुन अंदाजे काढण्य़ात आलेली आहे. उक्त भंगार साहित्याची किंमत अंदाजे असल्याने प्रत्यक्ष खुल्या लिलावात कमी / जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत साहित्याची विक्री/विल्हेवाट ई-लिलावाव्दारे करणे प्रस्तावीत आहे. सदर लिलावासाठी महानगरपालिका अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, सहा.आयुक्त (भांडार), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, भांडार अधिकारी व संबधित विभागाचा शाखाप्रमुख यांची लिलाव समिती गठीत करण्यात आली आहे. सदर विषयास लिलाव समितीने दि २८/८/२०१९ रोजी वरील भंगार साहित्याची विक्री ई-लिलावाव्दारे करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदर भंगार साहित्याची शासकीय मुल्यांकनानुसार अंदाजे किंमत र.रु. 23,62,500/- ( अक्षरी र.रु. तेवीस लाख बासष्ठ हजार पाचशें फक्त) मुल्यांकन काढणेत आलेले आहे. उपरोक्त नमुद केलेनुसार महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम मधील कलम ७९(क) नुसार महापालिकेची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता विक्री करणेस मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार उक्त भंगार साहीत्याची ई-लिलावाव्दारे विक्री करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शिक्षण विभागाकडील सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये अपुरी तरतुद असलेल्या कामाकरिता वाढ/घट करून तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र. | सन २०१९-२० ची तरतूद र.रु. | घट र.रु. | वाढ र.रु. | सन २०१९-२० चा सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाचे शाळांना आयएसओ ९००१-२०१५ नामांकन प्रमाणपत्र | सर्वागिक शैक्षणिक गुणवत्ता व विकास | क्र.३०४ अ.क्र. ४० | २०,००,०००/- | ० | ४३,०००००/- | ६३,००,०००/- |

,

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मिळणेकामी. | | | | | | |
| २ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५,००,००,०००/- | ४३,०००००/- | | |
| | | | | | - | | |

तसेच ग प्रभागातील प्रभाग क्र. २३ मधील मनपाच्या सन २०१९-२० च्या नवीन अंदाजपत्रकात स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तीक घरगुती शौचालय लाभर्थीनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/संस्था/ एजन्सी यांनी बांधकाम केलेल्या शौचालयाच्या गुणवत्ता तपासणीसाठी मे. इंडियन रजीस्टर ऑफ शिपींग (IRS) या संस्थेची त्रयस्थ संस्था/एजन्सी म्हणून नेमणूक करणे व तपासणी शुल्क अदा करणे गरजेचे आहे. त्यादृष्टिने भांडवली मुख्यालय-लेखाशिर्षातील कामांची प्रशासकीय मान्यता व तरतूद अत्यंत कमी असल्याने प्रभागातील भांडवली मुख्यालय कामांची निविदा काढलेनंतर संपुर्ण व्याप्तीचे काम होणे शक्य होणार नाही त्यामुळे खालील समावेश केलेल्या कामांची सन २०१९-२० मध्ये खर्च होणारी आवश्यक तरतूद वाढवून देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष/कामाचे नाव | पानांक | कामाचा अनु. क्र. | लेखाशिर्ष/कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० ची तरतूद | वाढ करावयाची तरतूद रक्कम रुपये | घट करावयाची तरतूद रक्कम | वाढ/घट केले नंतर सन २०१९-२० ची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तीक घरगुती शौचालय लाभर्थीनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/संस्था/एजन्सी यांनी | | | | ५००००० | ० | १००००० | ० | १००००० |

,

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बांधकाम केलेल्या शौचालयाच्या गुणवत्ता तपासणीसाठी मे. इंडियन रजीस्टर ऑफ शिपींग (IRS) या संस्थेची त्रयस्थ संस्था/एजन्सी म्हणून नेमणूक करणे व तपासणी शुल्क अदा करणे | | | | | | | | |
| २ | प्रभाग क्र. २३ मध्ये बापुजीबुवानगर व गावठाण परिसरातील रस्ते खडीमुरुम पध्दतीने विकसीत करणे (सन २०१९-२० साठी) | २३० | १ | भांडवली कामे | २५००००० | १७००००० | ० | १००००० | १६००००० |
| | एकूण | | | | ३०००००० | १७००००० | १००००० | १००००० | १७००००० |

तसेच स्थापत्य ई प्रभागाकडील सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात खालील कामाकरिता उपलब्ध असलेली तरतूद अपुरी आहे. सदर काम पूर्ण करणे साठी पुरेशी तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी खालील प्रमाणे वाढ/घट करून तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

,

| अ क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र.अ.क्र. | सन २०१९-२० ची तरतूद र.रु. | घट र. रु | वाढ.र.रु | सन २०१९-२० चा सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे आळंदी रस्ता ते दाभाडे वस्ती ४५ मी.डी.पी. रस्ता विकसित करणे. | विशेष योजना | २०/६८ | ३००००० | - | ६०,००००० | ६३,०००००/- |
| २ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५०००००००० | ६००००००० | | |

अनुकूल -८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४६४ विषय क्रमांक-९
दिनांक २०/९/२०१९ विभाग –मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दिनांक २/८/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

,

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४६५ विषय क्रमांक-१०

दिनांक २०/९/२०१९ विभाग –मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दिनांक २६/७/२०१९, चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४६६ विषय क्रमांक-११

दिनांक २०/९/२०१९ विभाग –मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

**अ)** दिनांक २४/७/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १४/८/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४६७ विषय क्रमांक-१२
दिनांक २०/९/२०१९ विभाग –मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती**

**अ**) दिनांक १२/७/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक २६/७/२०१९ व ९/८/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दिनांक ९/८/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे** –.मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४६८ विषय क्रमांक-१३
दिनांक २०/९/२०१९ विभाग –मा.नगरसचिव

**मा.शिक्षण समिती**

**अ)** दिनांक ४/४/२०१९, चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ब)** दिनांक ९/८/२०१९, चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**क)** दिनांक १८/४/२०१९, ७/५/२०१९,१६/५/२०१९, ६/६/२०१९, २०/६/२०१९, ४/७/२०१९, १६/८/२०१९ (दु.१.४५ वा),२९/८/२०१९ (दु.२.०० वा) व ३०/८/२०१९ (सकाळी ११.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ड**) दिनांक १६/८/२०१९ (दु.२.०० वा), २९/८/२०१९ (दु.२.१५ वा) व ३०/८/२०१९ (सकाळी ११.४५ वा) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

,

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहीर करतो.

----

**( राहूल गुलाब जाधव )**

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानरपालिका

पिंपरी-४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-४११ ०१८.

नगरसचिव कार्यालय

क्रमांक-नस/६/कावि/१/२०२०

दिनांक- ३०/१/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानरपालिका

पिंपरी-४११ ०१८.

**प्रत-** सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

,